अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । बुधवार
१४.१०.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: २५५ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### पंतप्रधान नरेंद्र मोदींवरील टिप्पणीप्रकरणी राहुल गांधी यांच्यावरील खटल्याला स्थगिती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात २०१९ मध्ये केलेल्या वादग्रस्त वक्तव्याप्रकरणी काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रातील ट्रायल कोर्टात सुरू असलेल्या मानहानीच्या खटल्याच्या पुढील कारवाईला स्थगिती दिली आहे. मंगळवारी न्या. विक्रम नाथ आणि न्या. अपरेश कुमार सिंग यांच्या खंडपीठाने महाराष्ट्र सरकार आणि तक्रारदार एम. एच. श्रीमाळ यांना नोटीस बजावली असून, चार आठवड्यांच्या आत उत्तर मागितले आहे. खंडपीठाने आपल्या आदेशात म्हटले आहे की, 'नोटीस चार आठवड्यांत परत करण्यायोग्य राहील.

## दिवाळीआधी शेतकऱ्यांना ५ हजार रुपये देणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्रात दुष्काळाच्या झळा पाहायला मिळत आहेत. याचपार्श्वभूमीवर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सह्याद्री अतिथीगृहावर मंत्रिमंडळाची विशेष बैठक बोलावली होती. या बैठकीत दिवाळी आधी ५ हजार रुपये शेतकऱ्यांना ॲडवान्स देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी मोठी घोषणा देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना केली.

**राज्यातील आणखी ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर**

**सीएम फडणवीसांचे कॅबिनेट बैठकीत धडाधड निर्णय**



दुष्काळ नोव्हेंबर शेवटी जाहीर होतो. मात्र परिस्थिती बघता आपण ॲडव्हासमध्ये दुष्काळ जाहीर केला आणि दुष्काळाबात जीआर ऑक्टोबर महिन्यात काढला. आम्हाला कल्पना आहे दिवाळी येते आहे, दिवाळी अडचणीची आहे. दुष्काळाची कार्यप्रणाली दिवाळीआधी पूर्ण होणं कठीण आहे. दिवाळीआधी सगळी कामं होऊ शकत नाही. मात्र एकूणच सगळ्या गोष्टी विचारात घेता, आज मंत्रिमंडळाशी चर्चा केली आणि दिवाळी आधी ५ हजार रुपये शेतकऱ्यांना अग्रीम देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दिवाळीआधी ५ हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होतील. सुमारे एक ते सव्वा कोटी शेतर्क?यांना मिळणार थेट खात्यात पैसे जमा होतील. ही अग्रीम मदत सुमारे ६००० कोटी रुपयांची असणार आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. राज्यात एकूण ३०५ तालुक्यात दुष्काळ जाहीर– राज्यात आणखी ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. आता राज्यात एकूण ३०५ तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. दुष्काळग्रस्त तालुक्यांत १२ सवलती मिळत राहतील. कर्जमाफीचे पैसेही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहेत. पिण्याचे पाणी देणाऱ्या टँकर्सची संख्या वाढतेय.

मराठवाड्यात पाणीपातळी ३ मीटरपेक्षा खाली गेली आहे. मराठवाड्यात हवे तेवढे टँकर देण्याचा निर्णय झाला आहे. पाण्याच्या टँकरचं जीपीएसद्वारे ट्रॅकिंग होणार असल्याची माहिती देवेंद्र फडणवीसांनी दिली. तसेच १६ हजार बेकायदा कनेक्शन आम्ही तोडलीयत. पिण्यासाठी पाणी राखीव ठेवण्यास प्राधान्य आहे, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.

## वृध्द सायकलस्वारास आयशर ट्रकने चिरडले

**शहरातील जायंटस चौक परिसरातील घटना**



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्टेट बँकेत सायकल जात असलेल्या वृध्द सायकलस्वारास भरधाव व अनियंत्रित आयशर ट्रकने चिरडल्याची घटना शहरातील जांयटस चौक परिसरामध्ये आज दुपारी १२ वाजताच्या सुमारास घडली. हा अपघात एवढा भिषण होता की, सायकलस्वाराचा डोक्याचा भाग पुर्णतः चेंदामेंदा झाला होता. अपघात घडताच घटनास्थळावर प्रचंड गर्दी झाली होती. पोलिसांनी लगेच घटनास्थळ गाठुन परिस्थिती नियंत्रणात आणली. रुग्णसेवकांच्या मदतीने मृतदेह तातडीने ग्रामीण रुग्णालयात रवाना करण्यात आला. गेल्या आठवडयात एका युवकाला अशाच पध्दतीने आपले प्राण गमवावे लागले होते त्यामुळे आता सर्वसामान्यांमध्ये शहरातील वाहतुकीविषयी प्रचंड रोष निर्माण होत आहे.

सविस्तर माहीतीनुसार, शहरातील सरस्वती नगर परिसरातील रहिवाशी असलेले सेवानिवृत्त कर्मचारी राजेंद्र केशव नेरकर (७०) हे आज सकाळच्या सुमारास त्यांच्या निवासस्थान परिसरातून सायकलने स्टेट बँक इंडिया शाखा वरुडमध्ये जात असतांना जायंटस चौक परिसरामध्ये एम.एच.४० सीटी ६७०३ या भरधाव व अनियंत्रीत ट्रकने त्यांच्या सायकलला जोरदार धडक दिली. या धडकेत राजेंद्र यांच्या डोक्याला गंभिर दुखापत झाल्याने त्यांचा जागेवर मृत्यू झाला. हा अपघात एवढा भिषण होता की, सायकलस्वाराचा डोक्याचा भाग पुर्णतः चेंदामेंदा झाला होता. अपघात घडल्याचे लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळ चांगलीच गर्दी केली होती परंतु अपघातग्रस्त राजेंद्र यांचा जागेवरच मृत्यू झाल्याने पोलिसांना पाचारण करण्यात आले. पोलिस घटनास्थळी दाखल होताच रुग्णसेवक अभिषेक जाधव व त्यांचा मित्रपरिवार तसेच न.प.आरोग्य समिती सभापती विनय खासबागे यांच्या मदतीने मृतक राजेंद्र यांना वाहनाने ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले.

त्यानंतर अनेकांनी रुग्णालयात गर्दी केली होती. दुपारच्या सुमारास राजेंद्र यांच्या पार्थीवाचे शवविच्छेदन पार पडल्यानंतर पार्थिव नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला. एका आठवडयात झालेल्या दोन अपघातांनी शहरवासियांमध्ये भिती निर्माण झाली असून अपघात होवु यासाठी उपाययोजना करण्याची मागणी केल्या जात आहे.

## रांका, दास यांना ५ दिवसांची न्यायालयीन कोठडी : तिहारमध्ये रवानगी, दिपके आक्रमक, : 'हिंमत असेल तर...

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – जंतर-मंतर परिसरात मंगळवारी (१३ऑक्टोबर) तिरंगा फडकवल्यानंतर कॉकरोच जनता पार्टीचे नेते सौरव दास आणि आशुतोष रांका यांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. या प्रकरणात न्यायालयाने दोघांनाही पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली असून, त्यांची तिहार तुरुंगात रवानगी करण्यात आली आहे. या कारवाईनंतर उगझ चे संस्थापक अभिजीत दिपके यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधत देशात 'अघोषित आणीबाणी' लादली जात असल्याचा आरोप केला. तसेच, 'हिंमत असेल तर अधिकृत आणीबाणी जाहीर करा...' असे आव्हान दिले. 'आणीबाणी लादायची असेल तर अधिकृतपणे लागू करा' माध्यमांच्या वृत्तानुसार, सौरव दास आणि आशुतोष रांका यांना पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आल्यानंतर दिपके यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला. 'मला नरेंद्र मोदी यांना सांगायचे आहे की, तुम्हाला देशात आणीबाणी लागू करायची असेल, तर ती अधिकृतपणे लागू करा,' असे ते म्हणाले आहे.

## सप्तश्रृंगी गडावर एफडीए प्रशासनाची मोठी कारवाई !

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**१,४०८ किलो मावासदृश मिठाई नष्ट**



**नाशिक** – नवरात्रोत्सवासाठी श्री सप्तश्रृंगी देवीच्या दर्शनाला जाणाऱ्या भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अन्न व औषध प्रशासनाने महत्त्वाची कारवाई केली आहे.

सप्तश्रृंगी गडावर राबविण्यात आलेल्या विशेष तपासणी मोहिमेदरम्यान १३ आस्थापनांवर कारवाई करण्यात आली, तर १८ अन्ननमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. याशिवाय, असुरक्षित परिस्थितीत साठवून ठेवलेला आणि नियमांचे पालन न करता विक्रीस ठेवलेला तब्बल १,४०८.७ किलो पामतेलयुक्त मावासदृश मिठाईचा साठा नष्ट करण्यात आला. या साठ्याची किंमत ५ लाख ६२ हजार ९० रुपये असल्याची माहिती प्रशासनाने दिली. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विशेष तपासणी मोहीम

नवरात्रोत्सवादरम्यान सप्तशृंगी गडावर देवीच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येतात. या काळात भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि गुणवत्तापूर्ण अन्नपदार्थ मिळावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासनाच्या नाशिक विभागामार्फत विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत गडावरील मिठाई विक्रेते, पेढा-प्रसाद विक्री केंद्रे तसेच इतर खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या आस्थापनांची तपासणी करण्यात आली. अन्नपदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता, साठवणूक आणि हाताळणी यांची पाहणी करत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांवर कारवाई करण्यात आली.

## नालासोपाऱ्यात १४ मजली इमारतीला भीषण आग

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**दोन महिलांचा मृत्यू, २५ रहिवाशांची सुटका**



**वसई** – नालासोपाऱ्यात बुधवारी (दि.१४) मध्यारात्री एका १४ मजली इमारतीला भीषण आग लागल्याने मोठी दुर्घटना घडली. नालासोपारा-वसई लिंक रोडवरील इम्पिरियल हाईट्स इमारतीत लागलेल्या आगीत दोन महिलांचा मृत्यु झाला, तर सहा जणांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. आगीमुळे संपूर्ण इमारतीत भीतीचं वातावरण निर्माण झालं होतं. अग्निशमन दलाने तातडीने बचावकार्य हाती घेत २५ जणांना सुरक्षित बाहेर काढलं.

**मध्यरात्री लागली आग**

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी मध्यरात्री १२ वाजून १० मिनिटांच्या सुमारास इम्पिरियल हाईट्स इमारतीला आग लागली. आग वेगाने पसरू लागल्याने रहिवाशांमध्ये घबराट उडाली. काही वेळातच इमारतीत धुराचे लोट पसरले. त्यामुळे अनेकांना बाहेर पडणं कठीण झालं. धुरामुळे गुदमरून दोन महिलांचा मृत्यू ? या दुर्घटनेत फाल्गुनी शाह (५०) आणि अश्विनी पारकर (५०) या दोन महिलांचा मृत्यू झाला. प्राथमिक वैद्यकीय माहितीनुसार, मोठ्या प्रमाणात पसरलेल्या धुरामुळे गुदमरून त्यांचा मृत्यू झाल्याचा संशय आहे. मात्र, मृत्यूचं नेमकं कारण शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे. या आगीत बाधित झालेल्या आणखी सहा जणांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

## तपोवन फाट्यावर दोन दुचाकी समोरासमोर धडकल्या: २ शिक्षकांसह ३ जणांचा मृत्यू, वाशिममधील घटना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वाशिम** – कारंजा ते मालेगाव मार्गावर तपोवन फाट्यावर दोन दुचाकीचा समोरासमोर धडकून भीषण अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. या भीषण अपघातात दोन्ही दुचाकीवरील तिघांचाही अपघात मृत्यू झाला आहे.ही धडक इतकी भीषण होती की, या धडकेत दुचाकींचा चक्काचूर झाला. कारंजा येथील उर्दू शाळेचे दोन शिक्षक दुचाकीने कारंजावरून वाशिम येथे शाळेच्या कामासाठी जात असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, या भीषण अपघातात या दोन्ही शिक्षकांचा मृत्यू झाला आहे. तर दुसऱ्या दुचाकीवरील व्यक्तीचा रुग्णालयात नेत असताना त्याचाही मृत्यू झाला.



# झेनिथ कॉन्सेप्ट स्कूलमध्ये गांधी जयंती सेवा सप्ताह व वन्यजीव सप्ताह उत्साहात

(प्रतिनिधी वरूड दर्पण)






**मोर्शी** – प्रसाद शिक्षण संस्थेच्या झेनिथ कॉन्सेप्ट स्कूल, तळणी–मोर्शी येथे महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त गांधी जयंती सेवा सप्ताह आणि जागतिक वन्यजीव सप्ताह विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी वक्तृत्व स्पर्धा, स्वच्छता अभियान, कृषी क्षेत्राला भेट आणि वन्यजीव संरक्षण व जलसंवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली. विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षण, पाण्याची बचत, स्वच्छता आणि वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासांचे जतन करण्याची शपथ घेतली.

शाळेच्या संचालिका तथा प्राचार्या डॉ.दीपाली सावन देशमुख यांनी विद्यार्थ्यांना समाजसेवा, स्वयंशिस्त आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. शरद लोणारे, पूजा केचे, अश्विनी धोटे व तेजस्विनी इंगळे यांनी उपक्रमांसाठी मार्गदर्शन केले. मैथिली मानकर हिने सूत्रसंचालन, तर तुलशी गावंडे हिने आभारप्रदर्शन केले. सर्व शिक्षकांच्या सहकार्याने दोन्ही सप्ताह यशस्वीरीत्या पार पडले.

# गौ मातेला 'राष्ट्रमाता' घोषित करण्याच्या मागणीला मोर्शीत उत्स्फूर्त प्रतिसाद

## आतापर्यंत सुमारे १० हजार नागरिकांच्या स्वाक्षऱ्या संकलित

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**मोर्शी** – गौ मातेला 'राष्ट्रमाता' म्हणून घोषित करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी सकल हिंदू समाज मोर्शी शहराच्या वतीने गौ सन्मान व स्वाक्षरी अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाला शहरातील नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत जवळपास १० हजार नागरिकांच्या स्वाक्षऱ्या संकलित करण्यात आल्या आहेत.

या अभियानांतर्गत मोर्शी शहरातील विविध भागांमध्ये नागरिकांपर्यंत पोहोचून गौ मातेचे संरक्षण, संवर्धन आणि सन्मान याबाबत जनजागृती करण्यात येत आहे. तसेच गौ मातेला 'राष्ट्रमाता'चा दर्जा मिळावा, या मागणीच्या समर्थनार्थ नागरिकांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या जात आहेत.

अभियानाला युवक, व्यापारी तसेच सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. या अभियानाचे पहिले दोन चरण यशस्वीरीत्या पूर्ण झाले असून, आता शहरातील विविध भागांत हे अभियान अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे.

गौ माता ही भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि परंपरेचे प्रतीक मानली जाते. गौ मातेचे संरक्षण व संवर्धन करण्यासोबतच तिला 'राष्ट्रमाता'चा दर्जा मिळावा, या मागणीला जनसमर्थन मिळवून देण्यासाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने हे अभियान सुरू असल्याचे सांगण्यात आले.

## सोने-चांदीचे दर

शुध्द सोने –९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने – ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी – १,३०,००० रु. (प्र.किलो)

## कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

**बाजारभाव ( क्विंटलमध्ये )**

| | | |
|---|---|---|
| ज्वारी – | १६५० – | २००० |
| गहू – | २५०० – | ३००० |
| तूर – | ६१०० – | ६३९० |
| मूग – | ६५०० – | ७००० |
| उडीद – | ६००० – | ७००० |
| हरभरा – | ५६०० – | ५९०० |
| सोयाबिन – | ४१०० – | ४३५० |
| बाजरा – | २००० – | २३०० |
| तिळ – | ८२०० – | ९३०० |
| भुईमूग – | ५१५० – | ५३५० |
| मका – | २२०० – | २३०० |

# खानापूरच्या पाणीप्रश्नासाठी खासदार अमर काळे सरसावले

## हातपंपाची मागणी प्राधान्याने सोडविण्याचे आश्वासन

## महिलांसह ज्येष्ठ नागरिकांनी दिले निवेदन

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मोर्शी** – मोर्शी तालुक्यातील खानापूर येथील प्रभाग क्रमांक २ मध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून, नागरिकांना पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या समस्येची दखल घेत गावातील महिला व ज्येष्ठ नागरिकांनी खासदार अमर काळे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन प्रभागात हातपंप बसविण्याची मागणी निवेदनाद्वारे केली.

यावेळी नागरिकांनी परिसरातील पाणीटंचाईची गंभीर परिस्थिती खासदार अमर काळे यांच्या निदर्शनास आणून दिली.

पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना होत असलेला त्रास लक्षात घेता, प्रभागात हातपंप बसवून पाण्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी करण्यात आली.

# ग्रामीण डाक सेवकांच्या विविध मागण्यांसाठी देशव्यापी आंदोलनाची हाक

## १२ नोव्हेंबरला एकदिवसीय लाक्षणिक संप

## मागण्या मान्य न झाल्यास डिसेंबरमध्ये बेमुदत संपाचा इशारा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




**मोर्शी** – ऑल इंडिया ग्रामीण डाक सेवक संघटनेच्या केंद्रीय शाखा, नवी दिल्ली यांच्या परिपत्रकानुसार ग्रामीण डाक सेवकांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी देशव्यापी आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या ऑनलाइन केंद्रीय कार्यकारिणीच्या सभेत घेतलेल्या निर्णयानुसार देशभरातील ग्रामीण डाक सेवक आंदोलनात सहभागी होणार आहेत.

आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात ५ ते १२ ऑक्टोबरदरम्यान ग्रामीण डाक सेवक काळ्या फिती लावून काम करणार आहेत. ८ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत लोकसभा व राज्यसभेच्या खासदारांना मागण्यांचे निवेदन देण्यात येणार आहे. त्यानंतर १५ ऑक्टोबर रोजी विभागीय कार्यालयासमोर आंदोलन, ४ नोव्हेंबर रोजी मुंबई येथील सर्कल कार्यालयासमोर धरणे आणि १२ नोव्हेंबर रोजी एकदिवसीय देशव्यापी लाक्षणिक संप करण्यात येणार आहे. या आंदोलनाची दखल घेऊन मागण्या सोडविण्यात न आल्यास डिसेंबर २०२६ मध्ये बेमुदत संप पुकारण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.

# दिल्लीच्या जंतरमंतरवर निदर्शनांवरील निर्बंधांना सुप्रीम कोर्टात आव्हान

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नवी दिल्ली** – दिल्लीतील ऐतिहासिक जंतरमंतरवर निदर्शने करण्यावर घालण्यात आलेले निर्बंध आणि आंदोलनांसाठी पर्यायी जागा ठरवण्याच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली आहे. राष्ट्रीय राजधानीत आंदोलनासाठी ठरवून दिलेल्या पर्यायी जागांच्या उपलब्धतेबाबत आणि योग्यतेबाबत याचिकेत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच जंतरमंतरला निदर्शनांसाठी अधिकृत ठिकाण म्हणून मान्यता दिली होती आणि रामलीला मैदान हे आंदोलनासाठी अयोग्य असल्याचे स्पष्ट केले होते, अशी आठवण याचिकेत करून देण्यात आली आहे.

## डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूलच्या

# राशी व अर्णवी याची विभागीय तायक्वांडो स्पर्धेत यश

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**वरूड** – स्थानिक नवयुवक शिक्षण संस्था अंतर्गत डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथील दोन विद्यार्थिनींनी नुकत्याच अकोला येथे झालेल्या विभागीय तायक्वांडो स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन करुन राज्यस्तरावर निवड झालेली आहे. पुन्हा एकदा या विद्यार्थिनींनी शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवला.

विभागीय स्तरावर झालेल्या १४ वर्षे वयोगटाखालील तायक्वांडो स्पर्धेत राशी सुधीर इंगोले व १७ वर्षे वयोगटाखाली तायक्वांडो स्पर्धेत अर्णवी अक्षय देशमुख या विद्यार्थिनींची विभागीय तायक्वांदो स्पर्धेत विजयी होऊन राज्यस्तरीय तायक्वांडो स्पर्धेत निवड झाली आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या विजयी विद्यार्थिनींचे नवयुवक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय गणोरकर, उपाध्यक्ष पुरुषोत्तम कळमकर, सचिव जगदीश नेरकर व संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापिका नीता चिमोटे, आदर्श मराठी प्रायमरी शाळेचे मुख्याध्यापक नितेश वाघमारे तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. यश प्राप्त केलेले विद्यार्थी त्यांच्या यशाचे श्रेय मार्गदर्शक आई वडील व क्रीडा शिक्षक शुभम कडू यांना देतात.

# सांगलीत अंनिसची राज्य कार्यकारिणी बैठक उत्साहात संपन्न

## 'फटाकेमुक्त दिवाळी'सह व्यसनमुक्तीसाठी राज्यभर अभियान राबविणार

(प्रतिनीधी वरूड दर्पण)






**सांगली** – महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची दोन दिवसीय राज्य कार्यकारिणी बैठक सांगली येथील माहेश्वरी मंगल कार्यालयात उत्साहात पार पडली. या बैठकीत राज्यातील २० जिल्ह्यांमधील ४६ शाखांचे २२६ कार्यकर्ते सहभागी झाले होते. यामध्ये ३४ महिला कार्यकर्त्यांचाही समावेश होता. अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ अधिक व्यापक करण्यासह सामाजिक प्रबोधनासाठी विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

बैठकीचे उद्घाटन डॉ.बाबुराव गुरव, सुभाष बापू पाटील आणि व्ही.वाय.पाटील यांच्या हस्ते डॉ.नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे, एम.एम.कलबुर्गी आणि गौरी लंकेश या चार शहीदांच्या चरित्र पुस्तकांचे प्रकाशन करून झाले. यानंतर जिल्हानिहाय कार्याचा आढावा घेण्यात आला. ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे यांनी 'माध्यमांचे वर्तमान' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी पत्रकार गणेश कांबळे यांना 'प्रा. प. रा. आर्डे स्मृती प्रेरणा पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

**फटाकेमुक्त दिवाळी आणि व्यसनमुक्तीवर भर**

बैठकीतील महत्त्वपूर्ण निर्णयानुसार, राज्यभरात 'फटाकेमुक्त दिवाळी' अभियान राबविण्यात येणार आहे. शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना फटाके न फोडता पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले जाणार आहे. या अभियानाच्या आवाहनपत्रावर प्रकाश आमटे, अच्युत गोडबोले, सोनाली कुलकर्णी आणि नागराज मंजुळे यांच्यासारख्या मान्यवरांच्या सह्या घेण्याचे नियोजन आहे. तसेच ३१ डिसेंबर रोजी 'चला व्यसनाला बदनाम करूया' हा उपक्रम राज्यभर राबवून व्यसनमुक्तीचा संदेश दिला जाणार आहे. बुवाबाजीला आळा घालण्यासाठी पोलिसांना निवेदन देण्याचाही निर्णय घेण्यात आला.

**प्रशिक्षण, प्रकाशन आणि जनजागृतीचे विविध उपक्रम**

संघटनेचे कार्य अधिक प्रभावी करण्यासाठी जिल्हावार कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे, शाखांशी समन्वय वाढविण्यासाठी ऑनलाइन बैठका घेणे, तसेच आदिवासी शासकीय आश्रमशाळांमध्ये प्रबोधनाचे कार्यक्रम सातत्याने राबविण्याचे ठरले. 'नरेंद्र दाभोलकर लोक विद्यापीठा'चे नवीन अभ्यासक्रम कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने तयार करणे आणि राष्ट्रीय संत व समाजसुधारकांवरील पुस्तकांचे दोन संच प्रकाशित करण्याबाबतही नियोजन करण्यात आले. याशिवाय 'अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्रा'च्या वार्षिक अंकासाठी जाहिराती व देणगी संकलन करण्यावर चर्चा झाली.

# मोर्शी शहरांमध्ये फोकस लेप्रसी कॅम्पेन व कॉन्टॅक्ट सर्वेक्षण मोहीम

(प्रतिनिधी वरूड दर्पण)






**मोर्शी** – उपजिल्हा रुग्णालय मोर्शी अंतर्गत शहरांमध्ये दिनांक १६ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर दरम्यान पेठपुरा, गडेघाटपुरा, महाराष्ट्र कॉलनी, रामजी बाबा नगर, खोलवाटपुरा व फरीद कॉलनी येथे फोकस लेप्रसी अभियान अंतर्गत सर्वेक्षण करण्यात येत आहे या मोहिमेमध्ये मा सहसंचालक आरोग्यसेवा कुष्ठरोग व क्षयरोग पुणे यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत सन २०२७ पर्यंत कुष्ठरोग संक्रमण शून्यावर आणणे हे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट केंद्र शासनाने निश्चित करण्यात आलेले आहे. सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी समाजातील लपलेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधणे निदान झालेल्या रुग्णाच्या निकट संपर्कातील व्यक्तीची तपासणी करणे नवीन रुग्णांमध्ये विशेषता बालक एमबी व विकृती असलेल्या ग्रेट १ व ग्रेड २ रुग्णाचे प्रमाण कमी करणे तसेच संसर्गाची साखळी खंडित करणे अत्यंत आवश्यक आहे त्या दृष्टिकोनातून मागील ५ वर्षांमध्ये निदान झालेल्या कुष्ठरुगणाचे सहवासीत व एफएलसी अंतर्गत विशेष जोखीमीच्या गटामध्ये एमबी बालक कुष्ठ रुग्ण विकृती असलेले ग्रेट १ व ग्रेड २ कुष्ठरोग असलेल्या वार्डामध्ये सर्वेक्षण करण्यात येत आहे.

सदर मोहीम उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथील वैद्यकीय अधीक्षक माननीय डॉ.प्रमोद पोतदार यांचे मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून या मोहिमेमध्ये मोर्शी शहरातील निवडक क्षेत्रामध्ये सर्वेक्षण करण्यात येऊन प्राथमिक अवस्थेतील कुष्ठरोग रुणाचा शोध घेण्यात येत आहे सदर मोहीम यशस्वी करण्याकरता कुष्ठरोग तंत्रज्ञ निळकंठ ठवळी तसेच आरोग्य कर्मचारी विनय शेलूरे, प्रकाश मंगळे, प्रशांत बेहरे यांचा या मोहिमेमध्ये सहभाग आहे.

## संपादकीय

**जीवन हा एक प्रवास आहे, तो आनंदाने जगा, तक्रार करुन नाही.**

# संविधानासोबत ‘शेतकऱ्यांचा आसूड’ही हाती घ्या!

महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा वारसा जपत शेतकरी, शेतमजूर आणि वंचितांच्या न्यायासाठी रिपब्लिकन पक्षाने वैचारिक वाटचाल करण्याची गरज भारतीय समाजव्यवस्थेतील विषमता, जातिभेद, सामाजिक अन्याय आणि आर्थिक शोषणाविरुद्ध महात्मा ज्योतिराव फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर संघर्ष केला. या दोन्ही महामानवांच्या विचारांचा केंद्रबिंदू हा केवळ सामाजिक परिवर्तन नव्हता, तर माणसाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा, त्याला शिक्षणाची संधी मिळावी आणि श्रम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळावा, हाही होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेले संविधान हा भारतीय लोकशाहीचा भक्कम आधार आहे, तर महात्मा फुले यांचा ‘शेतकऱ्यांचा आसूड’ हा ग्रंथ शेतकऱ्यांच्या शोषणाचे वास्तव समाजासमोर मांडणारा महत्त्वपूर्ण वैचारिक दस्तऐवज आहे. त्यामुळे संविधानासोबतच ‘शेतकऱ्यांचा आसूड’ हा ग्रंथही रिपब्लिकन पक्षाच्या वैचारिक वाटचालीचा मार्गदर्शक ठरला पाहिजे, ही काळाची गरज आहे. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या जीवनातील दुःख, कर्जबाजारीपणा, सामाजिक विषमता आणि प्रशासकीय व्यवस्थेतील त्रुटींवर परखड भाष्य केले. शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असूनही त्याच्या श्रमाला योग्य मोबदला मिळत नाही, त्याच्या कष्टाचे मोल अनेकदा दुर्लक्षित राहते, ही वस्तुस्थिती त्यांनी आपल्या लेखनातून अधोरेखित केली. ‘शेतकऱ्यांचा आसूड’ हा केवळ एका काळातील शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे वर्णन करणारा ग्रंथ नाही; तर शेतकरी आणि कष्टकरी वर्गाच्या प्रश्नांकडे सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून पाहण्याची दृष्टी देणारा विचारग्रंथ आहे. आजही शेतीसमोरील संकटे, उत्पादन खर्चातील वाढ, बाजारभावातील अनिश्चितता, कर्जाचा बोजा, नैसर्गिक आपत्ती आणि शेतीमालाला योग्य भाव मिळण्याचा प्रश्न चर्चेत असतो. अशा परिस्थितीत फुले यांच्या विचारांचे महत्त्व अधिक प्रकर्षाने जाणवते. शेतकऱ्यांच्या समस्या केवळ आर्थिक नसतात, तर त्या सामाजिक आणि व्यवस्थात्मक प्रश्नांशीही जोडलेल्या असतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर भूमिका घेताना त्यांच्या जीवनातील वास्तव समजून घेणे आणि धोरणात्मक बदलांसाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. संविधान आणि ‘शेतकऱ्यांचा आसूड’ यांचा वैचारिक संगम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांना लोकशाही व्यवस्थेच्या केंद्रस्थानी आणले.




# महिला शेतकरी : कायदेशीर ओळख

२०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून साजरे होत असताना, महाराष्ट्र शासनाने नुकतेच ‘महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण कायदा, २०२६’ विधेयक पारित केले आहे. त्यानुसार महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर ओळख, समान अधिकार आणि शासनाच्या कृषी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शेतकरी महिला प्रमाणपत्र देण्याच्या विशेष उपक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली आहे. या उपक्रमाविषयी ही माहिती...

महाराष्ट्र हे भारतातील तिसरे सर्वात मोठे राज्य आणि देशाचे आर्थिक व वित्तीय केंद्र आहे. भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात या राज्याचा १५ टक्के वाटा आहे. सरासरी १.१४ हेक्टर जमिनीसह सर्वाधिक भूधारक क्षेत्रांपैकी एक असलेल्या या राज्याच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचे महत्त्वपूर्ण ११.९ टक्के योगदान आहे.

महिला शेतकरी भारताच्या आणि महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देतात. भारतीय कृषी क्षेत्रात एकूण महिला मनुष्यबळापैकी ६५ टक्के महिला कार्यरत आहेत. कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाच्या कृषी विस्तार संचालनालयाच्या ’ कृषी क्षेत्रातील लिंगभाव दृष्टिकोन २०२१-२२’ या अहवालानुसार, कृषी क्षेत्रात कार्यरत असलेल्या एकूण महिलांपैकी ३३ टक्के शेतमजूर आहेत आणि ४८ टक्के स्वयंरोजगारित आहेत. विशेषतः महाराष्ट्राचा विचार केल्यास, २०१५-१६ च्या कृषी क्षेत्र सर्वेक्षणानुसार, राज्यातील एकूण कार्यरत जमिनीपैकी १४ टक्के जमिनी महिलांच्या मालकीच्या होत्या. सध्याची परिस्थिती लक्षात घ्यायची झाल्यास राज्यातील कृषी क्षेत्रात ८१ टक्क्यांहून अधिक महिलांचा सहभाग आहे. बहुतांश कृषी धोरणे व शासकीय योजना पुरुषकेंद्री आहेत. कृषी योजनांचा लाभ महिलांना मिळावा यासाठी जमिनीची मालकी ही अट असल्याने मोठ्या संख्येने महिला शेतकरी योजनांपासून वंचित राहतात. कुटुंबाच्या किंवा सामुदायिक जमिनीवर शेती करणाऱ्या महिला, तसेच मत्स्यव्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन, वनउपज संकलन यांसारख्या पूरक व्यवसायांमध्ये कार्यरत महिलांनाही शेतकरी म्हणून मान्यता मिळत नाही. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेनुसार, जर ग्रामीण भागातील महिलांना जमीन, तंत्रज्ञान आणि आर्थिक सेवा उपलब्ध झाल्या, तर जागतिक कृषी उत्पादन आणि अन्न सुरक्षा २० ते ३० टक्क्यांनी वाढू शकते असा अंदाज आहे.



### महिला शेतकऱ्यांचा उदयोन्मुख कृषी तंत्रज्ञानाशी असलेला संपर्क वाढवणे

महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्राला आणि अर्थव्यवस्थेला आकार देण्यात महिला शेतकऱ्यांची महत्त्वाची भूमिका राज्य शासन मान्य करते. १ ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेच्या आपल्या दूरदृष्टीचा एक भाग म्हणून, राज्य शासन महिला शेतकऱ्यांची क्षमता वाढवण्याचे आणि त्यांना उदयोन्मुख कृषी-तंत्रज्ञान व डिजिटल तंत्रज्ञानाची उपलब्धता करून देण्याचे उद्दिष्ट ठेवते, जेणेकरून त्या डिजिटल लाटेत मागे राहणार नाहीत आणि राज्याच्या विकासात योगदान देताना त्याचे फायदे मिळवू शकतील.



### शेतकरी महिलांचे सक्षमीकरण

शेती क्षेत्रातील पेरणी, निंदणी, कापणी, पशुपालन, दुग्धव्यवसाय, बीजसंवर्धन, भाजीपाला उत्पादन, शेतीमालाची प्रक्रिया अशा जवळपास प्रत्येक टप्प्यावर महिला वर्षानुवर्षे पुरुषांच्या बरोबरीने काम करत आल्या आहेत. तरीही शेतकरी ही ओळख मात्र बहुतेक वेळा जमिनीच्या सातबाऱ्यावर नाव असलेल्या व्यक्तीपुरतीच मर्यादित राहिली. त्यामुळे प्रत्यक्ष शेती करणाऱ्या लाखो महिलांचे योगदान मान्य असूनही त्यांना कायदेशीर दर्जा, आर्थिक हक्क आणि शासकीय योजनांमध्ये समान प्रवेश मिळत नव्हता. परिणामी पीक कर्ज, पीक विमा, कृषी अनुदान आणि इतर अनेक शासकीय योजनांपासून त्या वंचित राहत होत्या. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६ आणण्याचा निर्णय घेतला. २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून साजरे होत असताना, हे विधेयक राज्यातील महिला शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकातून राज्य शासनाने शेतीत अहोरात्र काम करणाऱ्या महिलांना एक ओळख दिली आहे. यापुढील काळात कृषी क्षेत्रात यामुळे महिलांचा सहभाग वाढणार आहे. महाराष्ट्र विधानपरिषदेत आणि विधानसभेत ‘महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक, २०२६’ हे केवळ नवीन कायदेविषयक पाऊल नाही, महिलांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता देण्याची ही संकल्पना कृषी क्षेत्रातील लिंगसमतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरू पाहत आहे.

महाराष्ट्राने या विधेयकाच्या माध्यमातून एक महत्त्वपूर्ण दिशा दाखविली आहे. पुढील काळात त्याची प्रभावी अंमलबजावणी झाल्यावर लाखो महिला शेतकऱ्यांच्या आयुष्यात प्रत्यक्ष बदल घडणार आहे. त्यांच्या श्रमांना सन्मान, हक्कांना कायदेशीर आधार आणि विकास प्रक्रियेत समान सहभाग मिळवून देण्याची क्षमता या विधेयकात आहे. महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता, समान हक्क आणि शासनाच्या सर्व कृषी योजनांचा लाभ मिळवून देणारे ‘महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६’ विधानपरिषदेत आणि विधानसभेत मंजूर करण्यात आले आहे. हे विधेयक राज्यातील महिलांसाठी एक ऐतिहासिक पाऊल ठरणार आहे. या विधेयकाच्या माध्यमातून महिलांना शेतकरी म्हणून कायदेशीर बहुमान देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली कृषी विभागाने हे विधेयक तयार केले आहे.

महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६’ हा कायदा विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात ७ जुलै २०२६ रोजी एकमताने संमत झाला असून राज्यपालांच्या मान्यतेनंतर २२ जुलै २०२६ रोजी राजपत्रात अधिकृतरित्या प्रसिद्ध करण्यात आला आहे.

### महिला शेतकऱ्यांना ओळख



या विधेयकाची सर्वात मोठी महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ङ्गशेतकरीङ्ख या संकल्पनेचा विस्तार. शेती ही केवळ पिकांच्या उत्पादनापुरती मर्यादित नसून पशुपालन, मत्स्यव्यवसाय, कुक्कुटपालन, मधमाशी पालन, रेशीम उद्योग, कृषी वानिकी, सेंद्रिय शेती, मशरूम उत्पादन, वनोपज संकलन आणि इतर पूरक व्यवसाय यांचाही त्यात समावेश आहे, ही वस्तुस्थिती या विधेयकाने स्वीकारली आहे. यामुळे भूमिहीन, भाडेपट्ट्यावर शेती करणाऱ्या किंवा शेतमजूर म्हणून काम करणाऱ्या महिलांनाही प्रथमच स्वतंत्र शेतकरी म्हणून ओळख मिळण्याची हमी प्राप्त झाली आहे.

विधेयकात महिला शेतकऱ्यांचा स्वतंत्र डिजिटल डेटाबेस तयार करण्याची तरतूदही महत्त्वाची आहे. आज अनेक योजना लाभार्थ्यांची अचूक माहिती उपलब्ध नसल्यामुळे अपेक्षित परिणाम साधू शकत नाहीत. डिजिटल नोंदणीमुळे योजनांचे नियोजन, अंमलबजावणी आणि लाभांचे वितरण अधिक पारदर्शक व परिणामकारक होण्यास मदत होऊ शकते. त्याचबरोबर महिला शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र निधी, कौशल्य विकास, उद्योजकता, आर्थिक सहाय्य आणि बाजारपेठेपर्यंत पोहोच यांसारख्या उपाययोजनांमुळे महिलांचे आर्थिक सक्षमीकरण अधिक व्यापक स्वरूपात घडणार आहे.



### महिलांनी अर्ज कसा करावा

महाराष्ट्रातील महिला शेतकऱ्यांना शासकीय योजना, कृषी कर्ज, विमा, कृषी निविष्ठा, विस्तार सेवा तसेच विविध कल्याणकारी योजनांचा लाभ अधिक सुलभतेने मिळावा, यासाठी महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत महिला शेतकऱ्यांना मान्यता देणे, त्यांना महिला शेतकरी प्रमाणपत्र देणे आणि अधिकृत डेटाबेस तयार करणे यासाठी ‘महिला शेतकरी पोर्टल‘ तयार करण्यात आले आहे. या पोर्टलचे उद्घाटन पुणे जिल्ह्यातील भरणेवाडी येथून कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते ऑनलाईन करण्यात आले.

राज्यातील महिला शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ अधिक सुलभतेने मिळावा, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. महिला शेतकऱ्यांसाठी प्रमाणपत्र मिळविण्याची ऑनलाइन सुविधा कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी https://krishi.maharashtra.gov.in? या संकेतस्थळावरून ऑनलाइन अर्ज करता येणार आहे.

महिलांचा जमिनीची मालकी नव्हे, शेतीतील प्रत्यक्ष सहभाग महत्वाचा असणार आहे. या अधिनियमामुळे महिला शेतकरी म्हणून मान्यता देताना केवळ जमिनीच्या मालकीचा निकष ग्राह्य धरला जाणार नाही. महिलेचा शेती व शेतीशी संबंधित कामांमधील प्रत्यक्ष सहभाग महत्त्वाचा मानण्यात आला आहे.

अधिनियमामध्ये शेती व शेतीपूरक व्यवसायांची व्यापक व्याख्या करण्यात आली असून, यामध्ये शेती, बागायती, भाजीपाला, पशुसंवर्धन, कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय, मधमाशीपालन, मत्स्यव्यवसाय, रेशीम उत्पादन, फळबाग, एरंडी उत्पादन, अंबाडी लागवड, कृषी-वनीकरण, कंपोस्ट निर्मिती यांसह विविध कृषी व शेतीपूरक कामांचा समावेश आहे.

याशिवाय भाडेपट्ट्याने किंवा बटाईने शेती करणाऱ्या महिला, भूमिहीन शेतकरी, भूमिहीन पशुपालक, शेतमजूर, रोपमळा मजूर व पशुधारक यांचाही महिला शेतकरी म्हणून समावेश करण्यात आला आहे. राज्यातील ग्रामपंचायत किंवा नगरपंचायत क्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या १८ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या आणि शेती व्यवसायात कार्यरत असलेल्या महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी पात्र ठरतात.

महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित अर्ज नियमानुसार ग्रामसभा किंवा नगरपंचायतीच्या विशेष सभेसमोर ठेवण्यात येतो. अर्जदार महिलेने अधिनियमात नमूद केलेल्या शेती अथवा शेतीसंबंधित कामांमध्ये सहभाग असल्याबाबत सभेमध्ये विचार करण्यात येतो.

अर्ज मान्य किंवा नामंजूर करण्याचा निर्णय घेताना त्याची कारणे लेखी स्वरूपात नोंदविण्यात येतात. ग्रामसभेने महिला शेतकरी म्हणून मान्यता दिल्यानंतर संबंधित पदनिर्देशित अधिकाऱ्यांकडून १५ दिवसांच्या आत महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्याची तरतूद करण्यात आली आहे. नगरपंचायत क्षेत्रातील अर्ज संबंधित सर्वसाधारण सभेसमोर मांडून त्यावर निर्णय घेण्यात येईल. मान्यता मिळाल्यानंतर पदनिर्देशित अधिकाऱ्यांकडून १५ दिवसांच्या आत प्रमाणपत्र देण्यात येते.

### सेवा संकल्प अभियानात जनजागृती

कृषी विभागाच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियमाची अंमलबजावणी करण्याबरोबरच पात्र महिला शेतकऱ्यांची ओळख पटविणे, त्यांना प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्यास प्रोत्साहित करणे, प्रशिक्षण व जनजागृती करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. राज्यातील पात्र महिला शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज करावा आणि या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

या सेवा संकल्प अभियानात आतापर्यंत राज्यातील विविध विभागांच्या तुलनेत कृषी विभागात सर्वाधिक नोंदणी झाली असून, महिला शेतकऱ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत सर्वाधिक सहभाग नोंदविला आहे. हा सहभाग महिला शेतकऱ्यांचा शासनाच्या योजनांबाबत वाढता विश्वास आणि सक्रिय सहभाग दर्शविणारा आहे. तसेच राहिलेल्या महिलांनी लवकरात लवकर ऑनलाइन नाव नोंदणी करुन घेण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.



### महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

महिला शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीतील योगदानाची अधिकृत ओळख मिळावी, यासाठी सुरू करण्यात आलेल्या महिला शेतकरी प्रमाणपत्र नोंदणीसाठी राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ७ ऑक्टोबर पर्यंत राज्यभरातून तब्बल ३७ लाख ९३ हजार ५१ अर्ज प्राप्त झाले. राज्यातील प्रत्येक पात्र महिला शेतकरी या उपक्रमाशी जोडली जावी, यासाठी कृषी विभागामार्फत सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. ७ ऑक्टोबर पर्यंत राज्यभरातून तब्बल ३७ लाख ९३ हजार ५१ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी राज्यातील ८९५ ग्रामपंचायतींनी ग्रामसभा घेऊन ६८ हजार ४३६ महिलांना शेतकरी महिला प्रमाणपत्र वितरित केले आहे. ग्रामसभा झाल्यानंतर पुढील १५ दिवसांमध्ये शेतकरी महिलांना प्रमाणपत्र वितरित केले जाते. विदर्भ आणि मराठवाड्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांतून मोठ्या प्रमाणात नोंदणी होत आहे. दाखल करण्यात आलेल्या अर्जसंख्येत अमरावती विभागातील यवतमाळ जिल्हा राज्यात आघाडीवर असून, तेथून २ लाख ५३ हजार ४३९ अर्ज प्राप्त झाले आहेत. सातारा २ लाख १४ हजार ७८७, नाशिक २ लाख १० हजार ३२७, अमरावती २ लाख ५ हजार ७४, पुणे १ लाख ७३ हजार ४९ एवढे अर्ज प्राप्त झाले आहेत. याशिवाय बुलढाणा, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, नंदुरबार, जळगाव, नांदेड, धाराशिव, धुळे, बीड आणि जालना जिल्ह्यांतून एक लाखांहून अधिक महिला शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. तालुकानिहाय नोंदणीत सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यात सर्वाधिक ३५ हजार ४२२ नोंदणी झाली आहे.

**अनिल आलुरकर**
उपसंचालक (माहिती) विभागीय माहिती कार्यालय, अमरावती

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# जनता हायस्कूलमध्ये घटस्थापनेच्या दिवशी शारदा देवीची स्थापना



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – राणी लक्ष्मीबाई महिला मंडळ शेंदुरजनाघाट शारदोत्सव २०२६ ची सुरुवात पूर्व प्रथेनुसार ११ ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबर सांस्कृतिक सभागृह जनता हायस्कूल येथे घटस्थापनेच्या दिवशी १६ ऑक्टोबरला शारदा देवीची स्थापना नगरपरिषद शेंदुरजनाघाट महिला बालकल्याण उपसभापती माधुरी माहुरे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी राणी लक्ष्मीबाई महिला मंडळ अध्यक्ष संगीता बेले, उपाध्यक्ष सविता सावरकर, सचिव नीलिमा कुबडे, सहसचिव प्रीती नागपुरे, सदस्य पद्मा माळोदे, माधुरी माहुरे, नीलिमा खेरडे, अर्चना बेलसरे, संध्या सावरकर, नलिनी शिरभाते, मिकिता खंडेलवाल व मीनल गणोरकर यांच्यासह सर्व महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होत्या तसेच ११ ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबर पर्यंत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून शारदोत्सव मोठा उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

## स्व.जयश्री अरविंद श्रीराव यांच्या स्मृतिप्रित्यर्थ

# वाचनालयातील विद्यार्थ्यांसाठी २१ हजार रुपयांची पुस्तके

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्व.जयश्री अरविंद श्रीराव यांच्या स्मृतिप्रित्यर्थ सद्या: नागपुर येथे राहात असलेले अरविंद श्रीराव यांनी पुसला येथील स्वयंअध्ययन केंद्र वाचनालयातील विद्यार्थ्यांसाठी २१ हजार रुपयांची पुस्तके भेट दिली. त्यांच्या या उपक्रमामुळे वाचनालयातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी तसेच ज्ञानवृद्धीसाठी मोलाची मदत होणार आहे.



विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांना अभ्यासासाठी आवश्यक पुस्तके उपलब्ध व्हावीत आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य साहित्य मिळावे, या उद्देशाने ही पुस्तकभेट देण्यात आली. या उपक्रमातून स्व.जयश्री यांच्या स्मृती



जपण्यासोबतच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला. यावेळी आशिष उर्फ गुड्डू श्रीराव, किरण चिमोटे, संदीप बागडे, गजानन नानोटकर, माजी सरपंच सुशीला श्रीराव, ॲड.राहुल श्रीराव आणि रवी वाहने यांच्यासह स्वयंअध्ययन केंद्र वाचनालयातील विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी केलेली ही पुस्तकभेट प्रेरणादायी असून सामाजिक बांधिलकी जपत शिक्षणाला प्रोत्साहन देणारा हा उपक्रम कौतुकास्पद आहे. या मदतीबद्दल स्वयंअध्ययन केंद्र वाचनालयाच्या वतीने अरविंद श्रीराव यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

# जिजामाता शाळेत किशोरवयीन विद्यार्थ्यांना जीवन कौशल्याचे मार्गदर्शन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – स्थानिक जिजामाता माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, मोर्शी येथे शारदोत्सवानिमित्त किशोरवयीन जीवन कौशल्य शिक्षण उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपजिल्हा रुग्णालय, मोर्शी येथील एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्राचे समुपदेशक श्रीकांत गोहाड यांनी विद्यार्थ्यांना किशोरवयीन अवस्थेतील शारीरिक,



बौद्धिक व मानसिक बदलांविषयी मार्गदर्शन केले.

किशोरवय हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्वाचा आणि संवेदनशील टप्पा असून, या काळात शरीर, विचार, भावना आणि वर्तनामध्ये अनेक नैसर्गिक बदल होत असतात. या बदलांचा सकारात्मक दृष्टिकोनातून स्वीकार करून व्यक्तिमत्त्वाचा विकास साधणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन श्रीकांत गोहाड यांनी केले.

विद्यार्थ्यांनी योग्य-अयोग्य गोष्टींमधील फरक ओळखावा, कोणताही निर्णय घेताना त्याचे परिणाम समजून घ्यावेत आणि स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवून आत्मविश्वास वाढवावा. तसेच मित्रमैत्रिणींशी संवाद साधताना परस्पर आदर, सहकार्य, सकारात्मक विचार आणि चांगल्या वर्तनाला महत्त्व द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.दीपक जावळे होते. प्रमुख अतिथी म्हणून शैलेश ठाकरे व प्रा.राजू कोटांगळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन मृणाली उईके यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा.ढोकणे यांनी केले.

# अभिजात मराठी भाषा सप्ताह उत्साहात साजरा

## भाषा हे मानवी जगणे व संस्कृतीचे प्रतीक : डॉ.अविनाश धोबे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – येथील जनता शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयात मराठी व ग्रंथालय विभागाच्या वतीने अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी तर प्रमुख वक्ते म्हणून मराठी विभाग प्रमुख डॉ.अविनाश धोबे, प्रमुख अतिथी म्हणून ग्रंथपाल डॉ.राजेश बोबडे, डॉ.प्रशांत चर्जन, डॉ.लुंबिनी गणवीर



उपस्थित होते. मराठी विभाग प्रमुख डॉ.अविनाश धोबे यांनी मराठी भाषेची वैभवशाली व समृद्ध परंपरा विविध उदाहरणाद्वारे विद्यार्थ्यांपुढे मांडली. प्राचीन काळापासून तर आधुनिक साहित्यप्रवाहांनी मराठी भाषा समृद्ध आणि अभिजात केली. माय मराठी ही आपल्या जगण्याचा श्वास असून ती आपल्या जीवनाचे व संस्कृतीचे प्रतीक आहे असे विचार त्यांनी व्यक्त केले. प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी यांनी अभिजात मराठी भाषेची थोरवी, भाषेला समृद्ध करण्यात कवी व साहित्यिकांचे असलेले योगदान, मराठी भाषेशी आपले असलेले ऋणानुबंध त्यांनी स्पष्ट करून दाखवले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ.राजेश बोबडे यांनी करून अभिजात मराठी भाषा दिवस साजरा करण्यामागील भूमिका यावेळी विशद केली. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिजामाता महाविद्यालयाच्या सृष्टी उईकेची विभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड

## जिल्हास्तरीय १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – स्थानिक जिजामाता माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, मोर्शी येथील इयत्ता बारावीची विद्यार्थिनी सृष्टी बाबूलाल उईके हिने जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत १९ वर्षाखालील वयोगटातील १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक



पटकावला. या उल्लेखनीय यशामुळे तिची यवतमाळ येथे होणाऱ्या विभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सृष्टीने मिळविलेल्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन तिचे अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. आपल्या यशाचे श्रेय तिने क्रीडा मार्गदर्शक रोशन खानंदे सर यांना दिले.

याप्रसंगी शाळेचे प्राचार्य सुधीरकुमार सवाई, ज्येष्ठ शिक्षक शैलेश ठाकरे, प्रा.जावळे, प्रा.कोटांगळे, प्रा.ढोकणे, कानबाले, गाडगे, गावंडे, भारती, खासबागे, नाखले, ढोक, तंतरपाळे, चौधरी व गोमकाळे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सृष्टी उईके हिच्या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून, विभागीय स्पर्धेतही ती उज्वल कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे.

# थाळीफेकमध्ये वेदांत बहुरूपीची 'गोल्डन' कामगिरी

## जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक : शांतिनिकेतन इंग्लिश स्कूलचा नावलौकिक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – अमरावती येथे ९ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित जिल्हास्तरीय थाळीफेक स्पर्धेत शांतिनिकेतन इंग्लिश स्कूल, मोर्शी येथील विद्यार्थी वेदांत बहुरूपी याने प्रथम क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

वेदांतच्या या यशाबद्दल शाळेच्या वतीने त्याचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अमोल चौधरी, उपमुख्याध्यापिका



राऊतकर, पर्यवेक्षिका लाडविकर, मुख्यप्रभारी महल्ले आणि समन्वयक चौधरी उपस्थित होते.

वेदांतला शाळेच्या क्रीडा शिक्षिका उघडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्याच्या मेहनतीला आणि मार्गदर्शनाला यश मिळाल्याने त्याने जिल्हास्तरावर आपल्या क्रीडाकौशल्याची छाप उमटवली. वेदांतच्या या यशाबद्दल शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी त्याचे अभिनंदन केले असून, पुढील क्रीडा स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# मोर्शीतील फटाका मार्केटची जागा बदलण्याची मागणी

## जयस्तंभ चौकातील फटाका मार्केटमुळे वाहतूक व सुरक्षेचा प्रश्न

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मोर्शी शहरातील जयस्तंभ चौक परिसरातील सोशल क्लबच्या मैदानावर भरविण्यात येणाऱ्या फटाका मार्केटची जागा बदलण्यात यावी, अशी मागणी मानवता फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप मनोहर ईंगळे यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दरवर्षी दिवाळीच्या काळात शासकीय नियमांनुसार सोशल क्लबच्या मैदानावर फटाका मार्केट भरविण्यात येते. मात्र, शहरातील वाढती लोकसंख्या आणि फटाके खरेदीसाठी होणारी गर्दी लक्षात घेता ही जागा फटाका विक्रीसाठी अयोग्य असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले



आहे. या ठिकाणी फटाके खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांना दुचाकी व चारचाकी वाहने उभी करण्यासाठी पुरेशी पार्किंग व्यवस्था उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होण्याची शक्यता आहे. तसेच, फटाका मार्केटमध्ये आग लागल्यास अग्निशमन दलाच्या वाहनाला घटनास्थळी पोहोचण्यासाठी तसेच वाहन फिरविण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.

या समस्यांवर उपाय म्हणून जयस्तंभ चौकातील सोशल क्लबच्या मैदानाऐवजी जिल्हा परिषद शाळेचे खुले मैदान किंवा शिवाजी माध्यमिक शाळेचे खुले मैदान येथे फटाका मार्केट भरविण्याचा पर्याय विचारात घ्यावा, अशी मागणी प्रदीप ईंगळे यांनी केली आहे.

दिवाळीच्या काळात नागरिकांची होणारी गैरसोय दूर करून सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाने फटाका मार्केटच्या जागेबाबत योग्य निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करा : रात्रीच्या वीजपुरवठ्याचा निर्णय रद्द करण्याची मागणी

## सावरखेड, भिवकुंडी परिसरातील शेतकऱ्यांचे महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मोर्शी** – शेतीपंपांसाठी रात्री २ ते सकाळी १० या वेळेत वीजपुरवठा करण्याच्या महावितरणच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे रात्रीऐवजी दिवसा नियमित वीजपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी सावरखेड व भिवकुंडी परिसरातील शेतकऱ्यांनी महावितरणच्या मोर्शी येथील कार्यकारी अभियंत्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे



की, रात्रीच्या अंधारात शेतात जाऊन सिंचन करणे शेतकऱ्यांसाठी धोकादायक ठरत आहे. परिसरात सर्पदंश, विंचूदंश तसेच वन्यप्राण्यांच्या हल्ल्याचा धोका असतो. याशिवाय रात्रीच्या वेळी पिकांना पाणी देताना, विद्युतपंपातील बिघाड दुरुस्त करताना आणि पाण्याचे नियोजन करताना अनेक अडचणी येतात. रात्री जागरण करून दिवसा शेतीची कामे करावी लागत असल्याने शेतकऱ्यांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहे. शेतीपंपांसाठी रात्री २ ते सकाळी १० या वेळेत वीजपुरवठा करण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करावा, शेतीसाठी नियमित दिवसा वीजपुरवठा करावा तसेच वीजपुरवठ्याचे वेळापत्रक ठरविताना शेतकऱ्यांची सुरक्षितता आणि शेतीच्या गरजा लक्षात घ्याव्यात, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांच्या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन दिवसा वीजपुरवठा सुरू करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी विनंती शेतकऱ्यांनी केली आहे. हे निवेदन महावितरणच्या कार्यकारी अभियंता, मोर्शी यांना सादर करण्यात आले. सावरखेड व भिवकुंडी परिसरातील समस्त शेतकऱ्यांच्या वतीने हे निवेदन देण्यात आले. निवेदनावर मोरेश्वर गुडघे, संतोष पेठे, राम धलवार, ओंकार साठे, अंशुला भाऊ पेठे, अजय राऊत, हरीसिंग मोहने, राजाभाऊ उबाळे, प्रणित राऊत, गंगाधर भुयार, शरद जीचकार इत्यादी त्रस्त कास्तकारांच्या सह्या आहेत.

# महामार्गांवर 'हवाई रुग्णवाहिका' सेवा सुरू करणार : समृद्धी, मुंबई-पुणे, मुंबई-गोवा मार्गांना प्राधान्य

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महामार्गांवर होणाऱ्या गंभीर रस्ते अपघातातील जखमींना वेळेत वैद्यकीय उपचार मिळून त्यांचे प्राण वाचावेत, या उद्देशाने सरकारने 'हवाई रुग्णवाहिका' सेवा सुरू करण्याचे नियोजन केल्याची माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. अपघातानंतरचा पहिला तास, म्हणजेच 'गोल्डन अवर', हा जखमींच्या उपचारांच्या दृष्टीने महत्वाचा असतो. अशावेळी जखमींना तातडीने ट्रॉमा केअर सेंटरपर्यंत पोहोचवण्यासाठी ही सेवा प्रभावी ठरणार आहे.

राज्यात हवाई रुग्णवाहिका सुरु करण्याबाबत आज मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीत बोलताना सरनाईक यांनी प्रकल्पासाठी १५ नोव्हेंबरपर्यंत एसओपी तयार करून तिला मंजुरी घेण्याचे नियोजन असल्याचे सांगितले. समृद्धी, मुंबई-पुणे, मुंबई-गोवा मार्गांना प्राधान्य समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई-गोवा महामार्ग या महत्वाच्या मार्गांवर अपघातग्रस्तांना जलद वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी विशेष यंत्रणा उभारण्याचे नियोजन आहे. या यंत्रणेअंतर्गत हवाई रुग्णवाहिका सेवेची उपलब्धता, जखमींना सुरक्षितपणे ट्रॉमा केअर सेंटरपर्यंत पोहोचविण्याची कार्यपद्धती आणि विविध आपत्कालीन यंत्रणांमधील समन्वय यांवर विशेष भर देण्यात येणार असल्याचे परिवहन मंत्र्यांनी सांगितले.

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान न्यायाधिश साहेब ( कनिष्ठ स्तर )**
**मोर्शी यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६६४/२०२६ ने.ता.२७/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) रत्नप्रभा मारोतराव इंगोले, वय अं.८० वर्ष, धंदा-घरकाम, २) चंद्रशेखर मारोतराव इंगोले, वय अं.५२ वर्ष, धंदा-शेती, ३) दिनेश मारोतराव इंगोले, वय अं.४९ वर्ष, धंदा-शेती, ४) उमेश मारोतराव इंगोले, वय अं.५० वर्ष, धंदा-शेती, क्र.१ ते ४ रा.हिवरखेड, ता.मोर्शी, ५) पुष्पा संतोषराव काळे, वय अं.५४ वर्ष, धंदा-घरकाम, ६) कल्पना दिलीपराव काळे, वय अं.४७ वर्ष, धंदा-घरकाम, अर्ज क्र.५ व ६ रा.चिस्तुर, ता.आष्टी

**... विरुध्द ... निरंक**

वरील अर्जदाराने विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर मोर्शी यांचे न्यायलयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार क्र.१चे पती व अर्जदार क्र.२ ते ६ चे वडील **नामे मारोतराव उर्फे मारोती महादेवराव इंगोले** यांचा दि.१९/०४/२०१८ रा.हिवरखेड, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मृत्यू झाला. अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस आहे. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय तथा निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताना वरील अर्जदारांशिवाय ईतर कोणतेही वारस नाहीत. नोटीसव्दारे कळविण्यात येते कि, जर कोणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सद नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महीण्याच्या आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक : १३/१०/२०२५

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश**
**( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९१९/२०२६ ने.ता.१९/११/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती लीला कृष्णराव गोमकाळे, वय अं.६७ वर्ष, व्यवसाय-गृहिणी, २) सौ.रजनी सदानंदराव चौधरी, वय अं.४८ वर्ष, व्यवसाय-शेती, रा.दिलवरपुर, सिरसगाव कोरडे, अमरावती, ३) सौ.उज्वला राजेंद्र बांबल, वय अं.४६ वर्ष, व्यवसाय-गृहीणी, रा.असनारे मंगल केंद्र समोर, कुंभारवाडी, अमरावती, ४) श्री.अविनाश कृष्णराव गोमकाळे, वय अं.४२ वर्ष, व्यवसाय-शेती, ५) श्री.अमित कृष्णराव गोमकाळे, वय अं.४२ वर्ष, व्यवसाय-शेती, अर्ज क्र.१,४ व ५- वार्ड नं.३, नवशक्ती चौक, टेंभूरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ... गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत कृष्णराव पांडुरंग गोमकाळे, रा.जामगांव, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१९/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१३/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी )**
**( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८३१/२०२६ ने.ता.३०/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) विलास महादेवराव वाघ, वय अं.५५ वर्ष, धंदा-शेती रा.राजुराबाजार, ता.वरुड, जि.अमरावती

२) सुनिता महादेवराव राऊत, वय अं.५० वर्ष, धंदा-घरकाम रा.वार्ड क्र.३, गजानन महाराज मंदिराजवळ, राजुरा बाजार

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत महादेव खंडुजी वाघ, रा.राजुरा बाजार, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०३/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी )**
**( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८५४/२०२६ ने.ता.२५/११/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती इंदुबाई सुखदेवराव फरकाडे, वय अं.७० वर्ष, धंदा-गृहिणी, २) प्रविण सुखदेवराव फरकाडे, वय अं.४३ वर्ष, धंदा-मजुरी, ३) भुषण सुखदेवराव फरकाडे, वय अं.३५ वर्ष, धंदा-मजुरी, क्र.१ ते ३ रा.बेनोडा, ता.वरुड, ४) सौ.अर्चना सुरेंद्र कडु, वय अं.४६ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.शिरजगांव (मोजरी), ता.तिवसा, ५) सौ.ज्योती सुधीरराव डहाके, वय अं.४० वर्ष, धंदा-गृहिणी, रा.नेरपिंगळाई, ता.मोर्शी

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत सुखदेवराव महादेवराव फरकाडे, रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२५/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०३/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# बारामतीत हवा सुनेत्रा पवारांची : 'सोमेश्वर' सहकारी साखर कारखान्याच्या प्रतिष्ठेच्या निवडणुकीत निर्विवाद वर्चस्व

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – बारामतीतील प्रतिष्ठेच्या बनलेल्या श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीचा निकाल मंगळवारी जाहीर झाला. गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात या निवडणुकीची चर्चा रंगली होती. पवार विरुद्ध पवार तसेच पवार विरुद्ध पुरुषोत्तम जगताप असा सामना या निवडणुकीत रंगला होता. तथापि, या संघर्षात सुनेत्रा पवार यांच्या पॅनलने २१ पैकी २१ जागा जिंकत निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आहे. त्यांनी प्रतिस्पर्धी नेत्यांच्या पॅनलला मान वर काढण्याची सुद्धा संधी दिलेली नाही.

सोमेश्वर साखर कारखान्याच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. या निवडणुकीत सुनेत्रा पवार यांच्या पॅनलने विद्यमान चेअरमन पुरुषोत्तम जगताप आणि युगेंद्र पवार यांच्या पॅनलचा दणदणीत पराभव केला आहे. युगेंद्र पवार यांच्या पॅनलकडे शरद पवार यांचे पॅनल म्हणून पाहिले जात होते. पुढच्या विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याची निवडणूक महत्वाची बनली होती. अजित पवारांच्या निधनानंतरची पहिलीच निवडणूक अजित पवारांच्या निधनानंतर सहकार क्षेत्रातली ही पहिलीच निवडणूक होती. ही निवडणूक सुनेत्रा पवारांचं नेतृत्व सिद्ध करणारी होती.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी )**
**( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७१५/२०२६ ने.ता.२४/१०/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती प्रतिभा दिलीप माहुरे, वय अं.४३ वर्ष, धंदा-हातमजुरी, २) कु.श्रेया दिलीप माहुरे, वय अं.२४ वर्ष, धंदा-शिक्षण, ३) आयुष दिलीप माहुरे, वय अं.२१ वर्ष, धंदा-शिक्षण, ४) श्रीमती सत्यफुला खुशाल माहुरे, वय अं.८० वर्ष, धंदा-काही नाही, सर्व रा.इंदिरा नगर, राजुरा बाजार, ता.वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत दिलीप खुशालराव माहुरे, रा.राजुराबाजार, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२९/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी )**
**( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९२१/२०२६ ने.ता.१९/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती अंजली आनंदराव मानकर, वय अं.७२ वर्ष, धंदा-गृहिणी, २) अंशुमन आनंदराव मानकर, वय अं.५१ वर्ष, धंदा-व्यापार, क्र.१ व २ रा.महात्मा फुले नगर, वरुड, ता.वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत आनंदराव रामजी मानकर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१९/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१३/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी ),**
**( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९१५/२०२६ ने.ता.१७/११/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती स्नेहलता रामदास इंगळे, वय अं.७७ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.सागर कॉलनी, लोणी, २) प्रज्ञा सुनिल राऊत, वय अं.५१ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.व्दारका कॉर्नर, नाशिक, ३) आशिष रामदास इंगळे, वय अं.४९ वर्ष, धंदा-नोकरी, रा.सागर कॉलनी, लोणी, ता.वरुड, जि.अमरावती, ह.मु.प्लॉट नं.१०, सेक्टर ३५, पनवेल, ४) मनिष रामदास इंगळे, वय अं.४६ वर्ष, धंदा-नोकरी, रा.सागर कॉलनी, लोणी, ता.वरुड, ह.मु.प्लॉट नं.बी.१०१, विवियाणा अपार्टमेंट, नाशिक

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत रामदास पंजाबराव इंगळे, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१७/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१३/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( कनिष्ठ स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९१०/२०२६ ने.ता.१८/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) भैय्या उर्फ भैय्यालाल महांगुद धुर्वे, वय अं.७६ वर्ष, धंदा-शेती रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती

२) लक्ष्मण महांगु धुर्वे, वय अं.७१ वर्ष, धंदा-शेती रा.बहादा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत महांगु झिटुजी धुर्वे, रा.बाहदा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१८/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०९/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




### नागरिकांच्या वाढत्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी

# आमदार यावलकरांनी घेतली अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर यांच्या वरुड येथील कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत नुकतीच संयुक्त आढावा बैठक पार पडली.

या बैठकीत वरुड-मोर्शी तालुक्यातील विभागनिहाय कामकाजाचा आ.यावलकर यांचेकडून आढावा घेण्यात आला. नागरिकांच्या तक्रारीचा तत्काळ निपटारा करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या. नागरिकांना भेडसावणाऱ्या तक्रारीची संबंधित अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घ्यावी व उपस्थित प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी योग्य उपाययोजना करावे, असे आदेश देण्यात आले.

सकाळी साडेअकरा वाजता वनविभाग, राष्ट्रीय महामार्ग विभाग, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि तहसील विभाग यांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. यावेळी विभागीय वनधिकारी, वरुड-मोर्शीचे वनपरिक्षेत्र अधिकारी, तहसीलदार, सा.बां.वि अभियंता, जि.प.कार्यकारी अभियंता यांची संयुक्त बैठक घेण्यात आली. तेव्हा संबंधित विभागांशी निगडीत विकासकामे, प्रलंबित प्रश्न आणि नागरिकांच्या समस्या जाणून घेत त्यावर चर्चा करण्यात आली.

मंजूर पांदन रस्ते तातडीने पुर्ण करण्यात यावे. बँकेशी संबंधित तक्रारीचा निपटारा करून शासनाच्या विविध योजनेचा लाभ शेतकऱ्यांना कसा मिळुन देता येईल? यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावे. दुष्काळ परिस्थिती लक्षात घेता संत्रा व इतर फळ बागायतदार व पशु वाचविण्यासाठी ड्रायझोनचा हट्ट वगळुन दोन्ही तालुक्यात विहिरी व बोअरवेलकरिता परवानगी द्यावी. याबाबत मुख्यमंत्री व पालकमंत्री यांच्यासोबत आ.यावलकर यांनी भ्रमणध्वनीवरुन संवाद साधत चर्चा केली व व्हॉट्सअॅपद्वारे पत्रव्यवहार केला. उपस्थित अधिकाऱ्यांकडून मतदार संघात सुरु असलेल्या कामांचा आढावा घेण्यात आला. जि.प.अंतर्गत येत असलेले ग्रामीण रस्ते बांधकामावेळी वनविभागाच्या अखत्यारीत येत असलेल्या जागेच्या अडचणीबाबत दोन्ही विभागाची संयुक्त बैठक घेऊन त्यांच्यातील मतभेद सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. वनपरिक्षेत्रातुन जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या पाईपलाईन संबंधित अधिकाऱ्यांनी कायदेतत्वावर शितीलता दाखवावी. यासह इतर अन्य विषयांवर आ.यावलकर यांनी निवेदने स्विकारुन त्यावर संबंधित अधिकाऱ्याशी सविस्तर चर्चा केली. दुपारी २ वाजता आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.

यावेळी जि.प.जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते. मतदारसंघातील आरोग्यविषयक प्रश्न, आरोग्यसेवा आणि संबंधित समस्यांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. आरोग्य अधिकाऱ्यानी कार्यालयीन वेळेत आपल्या कर्तव्यावर उपस्थित राहून रूग्णावर योग्य उपचार करून रुग्णांची काळजी घ्यावी व त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ कसा देता येईल? याबाबत मार्गदर्शन करावे. जेणेकरुन गोरगरीब, सर्वसामान्य व मध्यमवर्गीय रूग्णांना शासकीय रुग्णालयात उपचार घेणे अधिक सोयीस्कर होईल, ज्यामुळे अनेकांचे आरोग्य सुधारण्यास मदत होईल व उपचारा अभावी कुणाला आपला जिव गमवावा लागणार नाही, याबाबत दक्षता बाळगावी. या बैठकीला वरुड व मोर्शी तालुक्यातील नागरिक व भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याने गैरप्रकार उघड होतील

### केंद्र आणि राज्य सरकारवरही पृथ्वीराज चव्हाण यांची जोरदार टीका

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा दिल्यास २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतील कथित गैरप्रकार देशासमोर येतील आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पराभव होऊ शकतो, असा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केला. त्यामुळे ज्ञानेश कुमार सहजासहजी राजीनामा देणार नाहीत, असेही ते म्हणाले.

बालगंधर्व रंगमंदिर येथे विधान परिषदेच्या पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचार मेळाव्यानंतर पत्रकारांशी बोलताना चव्हाण यांनी निवडणूक आयोग, केंद्र सरकार आणि राज्यातील महायुती सरकारच्या कारभारावर टीका केली.

मुख्य निवडणूक आयुक्तांना पदावरून हटवण्यासाठी घटनात्मक प्रक्रिया उपलब्ध असून, विरोधकांकडे पुरेसे संख्याबळ नसले तरी महाभियोगाचा प्रस्ताव मांडून त्यावर संसदेत चर्चा व्हावी, अशी भूमिका त्यांनी मांडली.

देशातील बेरोजगारी आणि युवकांच्या आंदोलनांवर भाष्य करताना चव्हाण यांनी हे आंदोलन केवळ 'नीट' परीक्षेतील कथित गैरप्रकारांपुरते मर्यादित नसल्याचे सांगितले.

बेरोजगारी आणि भविष्याबाबतच्या चिंतेमुळे तरुण रस्त्यावर उतरले आहेत. आंदोलन दडपण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पोलीस आणि निमलष्करी दल तैनात केल्याचा आरोपही त्यांनी केला. शांततापूर्ण आंदोलन हा नागरिकांचा घटनात्मक अधिकार असल्याचे ते म्हणाले.

निवडणूक आयोगाच्या कामकाजाबाबत विरोधी पक्षांनी सरन्यायाधीशांकडे निवेदन देण्याचा प्रयत्न केला; मात्र निवेदन स्वीकारले गेले नसल्याचा दावा चव्हाण यांनी केला. यामुळे या प्रकरणातील शंका अधिक वाढल्याचे ते म्हणाले. महाराष्ट्रातील सत्तांतर आणि आमदारांच्या अपात्रतेच्या प्रकरणांतील विलंबावरही त्यांनी नाराजी व्यक्त केली.

# साताऱ्यात वाहन धुणे, स्विमिंग पूलवर बंदी

### पाणीवापर संस्थांमार्फत सिंचनाचे नियोजन करण्यासाठी मार्गदर्शन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**कराड** – सातारा जिल्ह्यात पाणीटंचाईचे संकट तीव्र होत असताना उपलब्ध पाणीसाठा पिण्यासाठी सुरक्षित ठेवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पाणी बचतीचे कडक निर्देश जारी केले आहेत.



वाहन धुणे, स्विमिंग पूलचा वापर आणि नवीन बांधकामांसाठी पिण्यायोग्य पाण्याचा वापर करण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच अनधिकृत बोअरवेल खोदणाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

कमी पावसामुळे भूजल पातळीत घट झाली असून विहिरी, बोअरवेल, नद्या आणि अन्य जलस्रोतांमधील पाणीसाठ्यावर परिणाम झाला आहे. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागांत पिण्याच्या पाण्याची टंचाई वाढत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी केले आहे.

ग्रामीण भागात धरणे, कालवे, नद्या व तलावांमधून पिण्याव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी होणारा अनधिकृत पाणीउपसा रोखण्यासाठी महसूल व जलसंपदा विभागाची संयुक्त पथके गस्त घालणार आहेत. टँकरद्वारे पाणीपुरवठा होणाऱ्या गावांमध्ये पाण्याचा वापर जपून करण्याच्या सूचना ग्रामपंचायतींना देण्यात आल्या आहेत.










